

विवेक क्षीरसागर यांच्या जन्मगावाला 'धामणेर'ला स्वच्छता अभियान मिळालेला पुरस्कार

# माझं गाव - आदर्श गाव

धामणेर. सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील एक गाव. कृष्णामाईच्या काठावर वसलेलं. निसर्गाचा वरदहस्त लाभलेलं. काळ्याशार शेतसरीनं वेढलेलं. त्याचबरोबर एक संपन्न असा आध्यात्मिक वारसा असलेलं. कधीकाळी इथे वैदिकांचं पुण्यक्षेत्र होतं, ज्याला धर्मपुरी या नावानं ओळखलं जात असे. तसंच गावाच्या उत्तरेस जवळच असलेल्या निगडी गावाचे रंगनाथ स्वामी यांनी ज्ञानपीठ चालवलेलं होतं. त्या ठिकाणी श्रावणात मोठी यात्रा भरत असे.

धामणेरच्या जवळच कृष्णामाईच्या डोहात राष्ट्रसंत श्री समर्थ रामदास स्वामींना आंग्लाई देवी व प्रभू रामचंद्र यांच्या मूर्ती सापडल्या होत्या. याच मूर्तींची प्रतिष्ठापना स्वामींनी अनुक्रमे सज्जनगड व चाफळ या क्षेत्री विधिवत केली, असा इतिहास आहे.

आधुनिक काळातील महान समाजसुधारक संत, संतश्रेष्ठ श्री. गाडगेमहाराज यांनी १९२३ साली सुमारे दोन वर्षे इथे वास्तव्य केलं होतं. धामणेर शेजारील ब्रम्हपुरी या ठिकाणी जी धर्मशाळा आहे, तिचा पायाभरणी कार्यक्रम गाडगेमहाराजांच्या पावन हस्तेच झालेला होता. त्या वेळच्या महाराजांच्या आठवणी सांगणारे वयोवृद्ध लोक आजही धामणेरमध्ये हयात आहेत. अलीकडच्या काळातील उदाहरण द्यायचं म्हटलं तर १९४९ साली संयुक्त सातारा जिल्ह्यातील आदर्श खेडे म्हणून तत्कालीन राज्यपालांच्या हस्ते गावाला बक्षीसही मिळाले होते त्यावेळी श्री. दिनकर धोंडी

क्षीरसागर, वय वर्षे ९९ हे सरपंच म्हणून कार्यरत होते. पण...काळाच्या ओघात इथली संपन्नता संपली. इथलं स्थान महात्म्य विस्मृतीत गेलं. दुर्दशेच्या काळ्याकुट्ट अंधारात जणू गाव निद्रिस्त झालं. याची कारणं काहीही असोत; परंतु, आज २१ व्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या जगाचा विचार करता, आजच्या परिमाणानुसार हे गाव तसं खूपच अविकसित राहिलेलं होतं, मागास राहिलेलं होतं, असंच म्हणावं लागेल. गावाच्या उपजीविकेचं साधन प्रामुख्याने शेती, तसेच काही जण लष्कराच्या सेवेत तर काही नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने गावाबाहेर, तर इतरजणांचे गाववाड्यातील उद्योग. नव्या जगाच्या शिष्टाचारापासून दूर असलेलं हे गाव, भाऊबंदकी आणि गट-तटांमध्ये विखुरलं गेलं होतं. इतकंच काय तर पोलीस डायरीमध्ये आजही अतिसंवेदनशील गाव म्हणून नोंद असलेलं हे गाव पंचक्रोशीत कुविख्यात झालेलं होतं. केवळ दुसऱ्या गटाचा म्हणून त्याच्या घरातील शुभ कार्याला तर नाहीच परंतु मयती सारख्या दुःखद प्रसंगी देखील सांत्वन म्हणून साधी उपस्थितीही टाळणाऱ्या प्रवृत्तीचं विदारक दर्शन या गावात घडत होतं. ही अतिशयोक्ती नाही तर हे इथलं वास्तव होतं. स्त्रिया हळदीकुंकवासारख्या समारंभाप्रसंगी दुसऱ्या गटातल्या स्त्रियांपासून दूर राहात होत्या. दुसऱ्या गटातील नवरदेवाची वरात वाजत-गाजत गावातून निघाली तर लोक चक्क घरांची दारं बंद करून घेत होते. कुणाचंही कुणाला कौतुक नव्हतं. सततच्या कडवट प्रतिक्रियांनी एकमेकांची मनं आणखीनच कलुषित होत होती. वैरभावना तीव्र-अतितीव्र होत गावाच्या एकूणच सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनातून अभिव्यक्त होण्यासाठी वेगवेगळ्या संधी शोधत होती. गावातील दोन्ही गट दुश्मनी जाणीवपूर्वक आणि दृढपणे निभावत होते. पण...

पण इतकं असूनही कुठंतरी माणसातला माणूस जागा होता. हृदयांमधून अजून माणूसकी पूर्णपणे हद्दपार झालेली नव्हती. कदाचित इथलं स्थान महात्म्य काळ विसरला नव्हता; म्हणून की काय, मनामनातली बेदिली नष्ट होऊ लागली आणि व्यर्थ विकल्प निर्माण करणारं जणू सारं काही विसरून, त्याला मूठमाती देऊन माणसं पुन्हा एकत्र येऊ लागली. स्वभावदोष आणि अनिष्ट प्रवृत्तींशी भांडायचं असतं, माणसांशी नाही हे या गावात हळूहळू उमजू लागलं. राजकारण-समाज-कारणासाठी, विकासकामासाठी असतं, एकमेकांशी दुश्मनी निभावण्यासाठी नाही, हे या गावानं जाणलं आणि राजकारणाच्या जागी राजकारण ठेवून इथली माणसं समाजकारणासाठी एकत्र येऊ लागली. गट-तट बाजूला ठेवून लोक गावाच्या भल्याचा विचार करू

लागले. हेव्यादाव्यांवर मातीच्या प्रेमाने निर्णायक विजय मिळविला. गावाविषयीची अस्मिता मनांमनांमध्ये जागृत झाली आणि बंधुत्वाच्या धाग्यानी इथल्या माणसांची मनं पुन्हा एकत्र बांधली गेली.

इथं प्रामुख्याने एक महत्त्वाचा मुद्दा नमूद करावासा वाटतो तो म्हणजे ग्रामस्थांच्या मानसिकतेमधील बदल हा काही चुटकीसरशी झालेला नाही.

कोणताही विधायक बदल हा काही अकस्मात होत नसतो. सुरुवातीला काही मोजके लोकच एकत्र येतात. त्यांचा प्रामाणिकपणा व सद्‌हेतू पाहूनंच मग त्यांचं इप्सित कार्य पुढं वाढत जातं. धामणेरमध्येही नेमकं असंच झालं. सुरुवातीच्या काळात ग्रामस्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग नसणाऱ्यांनाही पुढे अशा सद्‌हेतूनेच कृतिशील बनवलं आणि टप्प्या टप्प्याने स्वतःच्या कोषातून बाहेर पडून गावासाठी, समृद्धीसाठी काहीतरी करण्याची उदात्त भावना लोकांच्या मनात निर्माण केली. या उदात्त भावनेच्या जलानेच वैरत्वाचा अग्नी हळूहळू विझला गेला. पुढे होऊन गावासाठी काम करणाऱ्यांचा प्रामाणिकपणा लोकांना उमजला व त्यातूनच आपापल्या परीनं जेवढं शक्य आहे तेवढं योगदान देण्यासाठी लोकांची मानसिकता अनुकूल होऊ लागली. म्हणूनच कुणीही असं समजू नये की, विधायक काम सुरू केल्या केल्या लगेचंच आपल्याला व्यापक जनसहभाग लाभेल, सर्वच लोक आपल्या बरोबर येतील, ऐक्याच्या अभावाच्या पार्श्वभूमीवर मनोमिलनाचा प्रयत्न करतील.

एकीचं तत्त्व अंगीकारलं तर आपण स्वतःचं नशीब स्वतः बदलू शकतो, हे धामणेर गावानं कृतिशीलतेतून ओळखलं. आपल्या जीवनाचे शिल्पकार आपणच असतो, हे सत्य इथल्या माणसांनी कृतिशीलतेमधूनच हेरलं. एक नवा आशावाद आणि उत्साह धामणेरकरांमध्ये निर्माण झाला, जो आजही टिकून आहे आणि यापुढेही असाच टिकून राहण्याची स्पष्ट लक्षणं आहेत. अर्थातच मतभेद व वादविवाद पूर्णपणे संपलेले आहेत, असं नाही. ते तर असणारच परंतु समाज जीवनाला जहरी दंश करण्याची त्यांची ताकद आता नष्ट झालेली आहे. सभ्य मार्गाने, चर्चेने वाद मिटविण्याचा मंत्र निश्चितच गावाने अंगीकारला आहे असं म्हणायला हवं. लाठी काठीची भाषा आता धामणेरमध्ये दिसणार नाही, असं प्रस्तूत लेखकाचं ठाम मत आहे.

आपल्या गावाच्या उत्कर्षाची आस मनी-मानसी बाळगून कार्यरत असलेलं एक सुविद्य, निगर्वी, कुशल आणि खंबीर नेतृत्व निश्चितपणे इथल्या क्रांतिकारी

परिवर्तनाला कारणीभूत ठरलं. ज्याला हवा होता गावाचा विधायक बदल, सर्वांगीण विकास आणि समस्त गावकऱ्यांची एकी. गावातील पूर्वीचे सरपंच व विद्यमान जिल्हा परिषद सदस्य श्रीयुत विजयराव कणसे, वीरमाता कै. इंदुआत्या पवार आणि विद्यमान तरुण सरपंच श्री. शहाजी क्षीरसागर यांच्या रूपानं गावाला लाभलेलं हे नेतृत्व विचार करणारं आणि कर्मयोग आचरणारं होतं. त्यांचा हा प्रवास विकास आणि चैतन्यदायी उत्कर्षाचा एक-एक टप्पा नियोजनपूर्वक पार पाडत आजही सुरू आहे. 'ग्लोबल व्हिलेज' च्या या जमान्यात उज्ज्वल अशा भविष्याच्या दिशेने त्यांचे नेत्र पहात आहेत एक स्वप्नं, सुविकसित, स्वयंपूर्ण आणि आदर्श गावाचं! यापुढील काळातही उभ्या महाराष्ट्राचीच नाही तर अखंड भारताची शान ठरण्याचा दुर्दम्य आशावाद आणि दृढ आत्मविश्वास त्यांच्या ठायी व्यापून राहिलेला आहे. यशस्वी कारकिर्दीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा त्यांनी निश्चितच पार केलेला आहे. १९९२ सालीच पहिल्यांदा त्यांच्या नेतृत्वाची चमक दृष्टीस पडली, त्यांच्या पुढाकाराने धामणेरमध्ये स्थापना केलेल्या नेहरू युवा मंडळाला पाच राज्यांच्या विभाग पातळीवर उत्कृष्ट मंडळ म्हणून केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालयाचा पुरस्कारही प्राप्त झाला होता. मंडळाच्या माध्यमातून धामणेरकर युवकांनी केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक कार्याचा तो यथार्थ गौरवच होता. त्यांच्या नेतृत्वानं आकार घ्यायलाही त्याच कार्यातून प्रारंभ केला होता असं म्हटलं तरी वावगं ठरू नये.

मनमिळाऊ स्वभावाच्या नेतृत्वाखाली पुढे साऱ्या धामणेर गावानं ज्या एकीचं, त्यागाचं, श्रमदानाचं, विचारविनिमयाचं नियोजनबद्ध आणि दुर्दम्य इच्छाशक्तीचं दर्शन घडवलं त्याचं फळ म्हणून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात धामणेर गावानं संपूर्ण महाराष्ट्रात पहिला क्रमांक मिळवला. ऑगस्ट २००० मध्ये या अभियानाचा प्रारंभ झाला होता. अभियान काळात साऱ्या तरुणाईनं जीवाचं रान केलं, आपला गाव स्वच्छ, सुंदर, सुनियोजित आणि रम्य बनवण्यासाठी इथल्या पोरांनी सरपंचांच्या हाकेला 'ओ' दिली आणि प्रचंड असं श्रमदान देऊन विविध सुधारणांच्या कामांचा पाठपुरावा केला. ग्रामस्थांच्या भावनेला आव्हान करून लोकवर्गणीतून आपल्या गावाच्या विकासकामांसाठी पैसा उभा केला. रकमा कमी पडत असताना प्रसंगी सर्व तरुणांनी मिळून शेतात राबून मिळालेल्या रोजंदारीच्या पैशांतून आज दिसणारं देखणं धामणेर साकारलं. दिवसभर शेतात राबणाऱ्यांनी विश्रांतीची फिकीर न करता रात्रं-रात्रं जागून जे अमाप कष्ट उपसले, विकास कामांचा जो ध्यास घेतला तोच आज

इतिहासात अगदी सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात सरपंचांच्या नेतृत्वाखाली हळूहळू गांव एक झालं; स्वच्छ झालं, निर्मल झालं. हगणदारीमुक्त झालं, पक्के रस्ते झाले, उद्यानं झाली, गावाचा नूरच अगदी पालटून गेला. समस्त धामणेरवासीयांनी खऱ्या अर्थानं पुरुषार्थाचं दर्शन घडवलं. म्हणजेच डोकं चालवून कष्ट घेतले, द्वेषाच्या, अहंकाराच्या उर्मीवर प्रेमाने मात केली, म्हणूनच हे शक्य झाले. राज्यस्तरावरील संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात २००५ सालचं पहिल्या क्रमांकाचं पारितोषिक गावाने प्राप्त केले. पुणे येथे कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात दिनांक २२ एप्रिल २००६ रोजी केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री डॉ. रघुवंश प्रसाद सिंह यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री आर. आर. पाटील (आबा), जलसंपदा मंत्री अजितदादा पवार, ग्रामीण विकासमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार धामणेरला प्रदान करण्यात आला.

या राज्यस्तरीय पुरस्कारास पात्र ठरण्यापूर्वी २००० ते २००५ पर्यंत धामणेरने जिल्हा स्तराच्या टप्प्यावर एकूण तीन वेळा प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यातूनच ग्रामस्थांचा उत्साह वाढत गेला आणि जोमाने कृतिशील राहून राज्यस्तरावरील भव्य यश गावाने खेचून आणलं. तत्पूर्वीच देशपातळीवरील निर्मल ग्राम पुरस्काराच्या अटी गावाने पूर्ण केल्यामुळे २४ फेब्रुवारी २००५ या दिवशी भारताचे तत्कालीन राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ, मिसाईल मॅन, अब्दुल कलाम साहेब यांच्या हस्ते दिल्ली येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत दोन लाखांचा, देशपातळीवरील पहिला, निर्मल ग्राम पुरस्कारही धामणेर गावानं प्राप्त केला.

उत्थानाच्या या प्रवासात मागासवर्गीय समाजाच्या उन्नतीसाठी गावाने जे प्रयास, प्रयत्न केले त्याबद्दल सन २००१ साली जिल्हास्तरावरील समाज कल्याणाचा अस्पृश्यता निर्मूलन पुरस्कारही गावाने मिळवला होता. धामणेर मधील सवर्ण व दलित यांच्यामध्ये सामंजस्य, बंधूभावाची उदात्त भावना आढळते.

२००२ साली सातारा जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या हस्ते जिल्हास्तरीय, तर २००३ साली प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकरांच्या हस्ते राज्यस्तरीय 'आदर्श सरपंच' पुरस्कार पटकावणाऱ्या श्री. शहाजी

क्षीरसागर यांनी दिल्लीत विज्ञानभवनात पार पडलेल्या निर्मल ग्राम पुरस्कार वितरण समारंभाच्या वेळी देशभरातील उपस्थित प्रतिनिधींचे नेतृत्व केले. शिवाय आपल्या कार्यासंदर्भात उपस्थित जनसमुदायासमोर भाषणही केले. राष्ट्रपतींसमोर सरपंचांनी भाषण करावे असा हा इतिहासातील पहिलाच प्रसंग असावा. धामणेर गावानं सातारा जिल्ह्याचा, महाराष्ट्राचा लौकिक दिल्लीत राखला.

कधी काळी इतर गावांसारखेच मागासलेपणाचं, विस्कळीतपणाचं आणि अस्वच्छतेचं दर्शन घडवणाऱ्या धामणेर गावाचं विस्मयचकीत करणारं परिवर्तन लोकांनी अभ्यासावं, त्यापासून प्रेरणा घ्यावी, प्रत्येक गावामध्ये ग्रामविकासाची एक नवी चळवळ लोकांनी उभी करावी, समस्त ग्रामस्थांनी मनावर घेतलं तर गावाचं आणि ग्रामस्थांचं भाग्य कसं बदलू शकतं याचा त्यांनी बोध घ्यावा, नेतृत्व आणि समाजविकासाच्या प्रक्रियेतील टप्पे लक्षात घ्यावेत म्हणूनच हा लेखनप्रपंच.